| MHSN110007722015 | नियमित दिवाणी दावा क्र.२०२/२०१५<br>किसन देवडकर / सुनिल देवडकर |
|---|---|

**निशाणी ५८ खालील आदेश**

प्रस्तुत प्रतिदावा अतिक्रमण दूर होवून मिळण्यास दाखल करण्यात आलेला आहे. कैफियत देवून वादीने अतिक्रमण नाकारलेले आहे. अशा परिस्थितीत प्रतिदाव्यातील वादीचा तोंडी पुरावा झालेला असून प्रतिदाव्यातील प्रतिवादीने अतिक्रमण केले आहे किंवा कसे याबाबत गट नं.१६८ व ३२ यांची संयुक्तिक मोजणी होणे गरजेचे आहे. त्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला असून प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी योग्य तो आदेश व्हावा असे नमूद केलेले आहे. सबब, उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मोजणी होणे आवश्यक असल्याने मी खालील आदेश पारीत करतो.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. उपअधीक्षक, भूमी अभिलेख, आटपाडी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते.

३. प्रतिदाव्यातील वादी यांनी योग्य ते शुल्क जमा करावे.

४. उपअधीक्षक, भूमी अभिलेख, आटपाडी यांनी दावा मिळकत गट नं.३२ व १६८ ची ई.टी.एस. प्रणाली द्वारे मोजणी करुन प्रतिदाव्यात नमूद केल्याप्रमाणे अतिक्रमण आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल कमिशन काम मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयाकडे सादर करावा.

५. प्रतिदाव्यातील वादीने आदेशाची पुर्तता करावी.

VINAYAK DATTATRAY PATIL
Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2023.06.19 10:15:32 +0530

आटपाडी. (वि. द. पाटील)

दिनांक : १७/०६/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आटपाडी

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 17/06/2023 |
| Order signed by the Presiding Officer | : | 17/06/2023 |
| Order uploaded on | : | 19/06/2023 |